Nilima G. Irpache

# GENERAL HOSPITAL, WARDHA

Dr. P.D. Madavi
Civil Surgeon
District Hospital Wardha

O/o Civil Surgeon
District Hospital Wardha
☎ (07152)230772
E-mail- cswardha@rediffmail.com

आरोग्य सेवा
<u>आदेश</u>

जा.क्र./मारुग/आस्था/नियुक्ती/गट ड/8759-65/१७
कार्यालय: जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय,
वर्धा : दिनांक 21/08/2017

विषय - कक्षसेविका गट ड या पदावर सरळसेवेने नियुक्तीबाबत
श्री / श्रीमती कु.निलीमा गोपिचंद इरपाचे

संदर्भ - सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत घेण्यात आलेली दि. २२/०१/२०१७
रोजीची लेखी परिक्षा

आरोग्य सेवा संचालनालयाच्या अधिनस्थ **जिल्हा शल्य चिकीत्सक, सामान्य रुग्णालय वर्धा** या कार्यालयाच्या अधिनस्थ संस्थेतील **कक्षसेविका** (वेतनश्रेणी रु.४४४०-७४४०/- + ग्रेड वेतन १३००/- ) या पदाकरीता सार्वजनिक आरोग्य विभागांतर्गत घेतलेल्या लेखी परिक्षेच्याअनुषंगाने जाहिर केलेल्या गुणवत्ता व निवड यादीनुसार श्री/श्रीमती **कु.निलीमा गोपिचंद इरपाचे** यांची निवड **कक्षसेविका** (वेतनश्रेणी रु.४४४०-७४४०/- + ग्रेड वेतन १३००/-) या पदाकरीता **अनुसुचित जमाती (महिला)** या प्रवर्गातून करण्यात आलेली आहे. त्यानुसार आपली नियुक्ती **नागपूर** परिमंडळांतर्गत **वैद्यकिय अधिक्षक, उपजिल्हा रुग्णालय हिंगणघाट, जि. वर्धा** येथे रिक्त पदावर रु.४४४०-७४४०/- + ग्रेड वेतन १३००/- या वेतनश्रेणीत तात्पुरत्या स्वरुपात पुढील अटी व शर्तीच्याअधीन राहून करण्यात येत आहे.

१) सदर नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यापासून १५ दिवसाच्या आत आपण नियुक्तीच्या ठिकाणी त्वरीत हजर व्हावे व रुजू अहवाल सादर करावा. आपण या कालावधीत हजर न झाल्यास आपण या पदावर रुजू होण्यास इच्छुक नाही असे समजून आपली नेमणूक रद्द करण्यात येईल.

२) आपण रुजू झाल्यापासून ६ महिन्याच्या कालावधीत सक्षम प्राधिका-यांचे वैद्यकिय तपासणी प्रमाणपत्र , पूर्व चारित्र्य प्रमाणपत्र, जात वैधता प्रमाणपत्र सादर करावे लागेल. सदर बाबींची पूर्तता न केल्यास आपली नियुक्ती तात्काळ संपुष्टात आणण्यात येईल.

३) आपली नियुक्ती जिल्हा शल्य चिकित्सक यांनी दिलेल्या शारीरिकदृष्टया पात्र असल्याच्या प्रमाणपत्राच्या आधारावर अवलंबून राहील. सदर प्रमाणपत्राव्दारे आपण शासकीय सेवेत अपात्र ठरविले गेल्यास आपणास तात्काळ सेवेतून कमी करण्यात येईल.

४) आपली नियुक्ती पूर्वचारित्र्याची पडताळणी करण्यापूर्वी करण्यात येणार असल्यामुळे आपली नियुक्ती ही निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची आहे. आपले पूर्व चारित्र्य व वर्तणूक अहवाल पोलीस

https://web.whatsapp.com
Scanned with CamScanner

२०१४-१५.



शुभांगी चाफळे

क्रमांक : कक्ष-६/पो.भ.-२०१४/पोशि-नियुक्ती/२०१४ वर्धा, दिनांक :- 28 OCT 2014

-: आ दे श -:

खालील नमुद उमेदवारांची नवप्रविष्ठ पोलीस शिपाई म्हणून वेतनश्रेणी रुपये ५२००-२०२०० अधिक ग्रेड वेतन रुपये २०००/- अधिक रुपये ५००/- विशेष वेतन व देय असलेले इतर भत्ते यामध्ये खालील नमुद अटींचे अधिन राहुन निव्वळ तात्पुरती व अस्थायी स्वरुपाची ते पोलीस मुख्यालय, वर्धा येथे हजर झाल्याचे तारखेपासून नेमणुक करण्यांत येत आहे. सदरहू आदेश निर्गमीत केल्याचे तारखेपासून दोन दिवसाचे आंत नेमणुकीचे ठिकाणी हजर व्हावे.

१. मा. महाराष्ट्र प्रशासकिय न्यायाधिकरण, मा. उच्च न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय यांनी दिलेल्या न्यायनिर्णयाचे अधीन राहून तसेच यासंबंधाने महाराष्ट्र शासन, गृहविभाग मंत्रालय, मुंबई व अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी वेळोवेळी दिलेल्या निर्देशाचे अधीन राहून.

२. पोलीस शिपाई पदाकरिता विहीत केलेले प्रशिक्षण पुर्ण करावे लागेल व संबधीत परीक्षा उत्तीर्ण व्हावे लागेल. जर ३ संधीत उमेदवार परीक्षा उत्तीर्ण झाले नाही तर कोणतीही पुर्वसुचना न देता सेवा समाप्त करण्यांत येईल.

३. पोलीस शिपाई सेवा प्रवेश नियम २०११ मधील नियम ११ नुसार वर्धा जिल्हा पोलीस घटकात नियुक्ती देण्यांत आलेली आहे. त्यामुळे वर्धा जिल्हा पोलीस घटाकाव्यतीरीक्त इतर पोलीस घटकात बदली करता येणार नाही.

४. वर्धा जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर पोलीस शिपाई या पदावर भरती झाल्यानंतर प्रशिक्षण कालावधी अथवा प्रशिक्षण संपल्यानंतर पुढील तीन वर्षात पोलीस शिपाई या पदावरुन नौकरीचा राजीनामा दिल्यास वा सदर पदावरुन कार्यमुक्त करण्यांस विनंती केल्यास प्रशिक्षणावरील झालेला सर्व खर्च प्रशिक्षण कालावधीत अदा केलेल्या वेतन व भत्यासहीत वसुल करण्यात येईल.

५. वर्धा जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर पोलीस शिपाई या पदावर निवड झाली असून सन २०१४ च्या पोलीस भरतीच्या वेळी जाहीरातीत नमुद केल्याप्रमाणे अन्य कोणत्याही पोलीस घटकात आवेदन अर्ज भरलेला नाही अथवा अन्य कोणत्याही पोलीस घटकात भरती करिता उपस्थित राहीलेलो/राहीलेले नाही. जर मी अन्य पोलीस घटकात अवेदन अर्ज भरल्याचे अथवा अन्य पोलीस घटकात पोलीस भरती करिता उपस्थित राहील्याचे निदर्शनास आल्यास माझी पोलीस शिपाई पदी झालेली निवड रद्द करण्यांस व माझ्या विरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यांस पात्र राहील.

६. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक बीसीसी २०११/प्र.क्रं.१०६४/२०११ / १६-ब, दिनांक १२-१२-२०११ अन्वये नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर उमेदवारांनी नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्याच्या आंत आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता संबधीत जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. उमेदवारांनी नियुक्ती स्विकारताच जात वैधता तपासणी करण्यासाठी प्रस्ताव संबधीत जात पडताळणी समितीकडे सादर करावा व जात पडताळणी समितीने दिलेल्या पोच पावतीची साक्षांकीत प्रत नियुक्ती प्राधिका-यास सादर करावा.

Scanned with CamScanner

Shubhangi Chafale.

७. चारीत्र्य सत्यापन अहवाल प्राप्त झाल्यावरही काही आक्षेपार्ह बाबी आढळून आल्यास आपली नियुक्ती रद्द केल्या जाईल.

८. पोलीस शिपाई सेवा प्रवेश नियम २००६ नुसार मुंबई पोलीस अधिनियम १९५९ मुंबई पोलीस शिस्त व अपील नियम १९५६ व राज्य शासनाने वेळोवेळी विहीत केलेले नियम लागू राहील.

९. शासनमान्य संस्थेव्दारा एम.एस.सी.आय.टी.परीक्षा उत्तीर्ण करणे आवश्यक आहे.

१० महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अनियो/१००५/१२६/सेवा-४ दिनांक ३१-१०-२००५ अन्वये दिनांक १-११-२००५ नंतर शासन सेवेत नियुक्त होणा-या कर्मचा-यांना नवीन परीभाषीत अंशदान निधी योजना लागू ठरेल. सध्या अस्थीत्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्ती वेतन नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण ) नियम १९८४ आणि सध्या अस्तिवात असलेली सर्व साधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहणार नाही.

| अ.क्रं | चेस्ट क्रमांक | उमेदवाराचे पुर्ण नाव | जातीचा प्रवर्ग | नियुक्तीचा प्रवर्ग | पोलीस भरतीमध्ये मिळालेले गुण | वाटप करण्यांत आलेला बक्कल क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | ५०१० | शुभांगी वासुदेवराव चाफले | इमाव | इमाव | १४३ | १७५७ |

आदेशपत्र प्राप्त झाली
Schafale
29/10/2014
T- 10.30 am

(अनिल पारस्कर)
पोलीस अधीक्षक, वर्धा

प्रति,

शुभांगी वासुदेवराव चाफले
मु.पो.आंजी (मोठी)
ता.वर्धा जि.वर्धा

प्रत:- राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय, वर्धा यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
२/- सदरहू उमेदवार पोलीस मुख्यालय, वर्धा येथे कर्तव्यावर हजर झाल्याची तारीख व वेळ या कार्यालयास त्वरीत कळवावी.

प्रत :- :- प्रमुख लिपीक लेखा शाखा / वेतन लिपीक / मराठी पोलीस राजपत्र लिपीक / कक्ष-९ आस्थापना शाखा लिपीक यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.

प्रत :- भांडारपाल / वस्त्रागार पोलीस मुख्यालय, वर्धा यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.
प्रत :- प्रमुख लिपीक पत्रव्यवहार शाखा यांना माहिती व आवश्यक कार्यवाही करिता.

Scanned with CamScanner